**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री मोदी यांच्या हस्ते बिहारमध्ये गयाजी इथं १३ हजार कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन

- दिल्ली परिसरातल्या भटक्या कुत्र्यांची नसबंदी आणि लसीकरण करून त्यांच्या पूर्वीच्या परिसरात सोडण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश

- जम्मूत विविध ठिकाणी ईडी अर्थात सक्तवसुली संचालनालयाचे छापे

**आणि**

- भारताचा पहिला एकात्मिक ग्रीनफिल्ड स्मार्ट औद्योगिक शहर प्रकल्प महाराष्ट्रात छत्रपती संभाजीनगर इथं सुरू होणार

**<><><><><>**

प्रधानमंत्र्यांपासून ते मुख्यमंत्र्यांसहित कोणत्याही मंत्र्याला अटक झाल्यास जर ३० दिवसांच्या आत त्याला जामीन मिळाला नाही तर ३१व्या दिवशी त्याला राजीनामा द्यावा लागेल असा कायदा केंद्र सरकार आणू पाहत आहे, परंतु सर्व विरोधी पक्ष याला विरोध करत आहेत, अशी टीका प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केली. बिहारच्या गयाजी इथं आज ते एका जाहीर सभेत बोलत होते.

प्रधानमंत्री आज बिहार आणि पश्चिम बंगालच्या दौऱ्यावर आहेत. बिहारमध्ये गयाजी इथं १३ हजार कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन त्यांच्या हस्ते झालं. यामध्ये उर्जा, रस्ते, आरोग्य, गृहनिर्माण, शहरी विकास आणि पाणीपुरवठा अशा विविध विकास योजनांचा समावेश आहे. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत गेल्या अकरा वर्षांत ११ कोटी घरं दिली गेली असून बिहारमध्ये फक्त गयाजी मध्येच २ लाख घरं दिली असल्याचं ते म्हणाले. या घरांमध्ये वीज, पाणी, शौचालय आणि गॅस जोडण्या दिल्या गेल्या आहेत. देशातल्या

प्रत्येक कुटुंबाला पक्कं घर मिळेपर्यंत ही योजना सुरूच राहील असं प्रधानमंत्री मोदी यांनी यावेळी सांगितलं. यावेळी प्रधानमंत्र्यांच्या हस्ते प्रधानमंत्री आवास योजनेच्या काही लाभार्थ्यांना प्रातिनिधिक रूपात घरांच्या चाव्या देण्यात आल्या. राज्यातल्या रोजगारनिर्मितीसाठी केलेल्या प्रयत्नांबद्दल त्यांनी मुख्यमंत्री नितीश कुमार यांचं कौतुक केलं. बिहारमध्ये कर्करोगावरच्या उपचारांसाठी सुरू झालेल्या रुग्णालयाविषयी प्रधानमंत्री म्हणाले.

**होल्ड.. बाईट - मोदी**

बिहारच्या विकासासाठी केंद्र सरकारनं केलेल्या साहाय्याबद्दल मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी प्रधानमंत्र्यांना धन्यवाद दिले.

बिहार इथला दौरा आटोपल्यानंतर प्रधानमंत्री पश्चिम बंगालमध्ये कोलकाता इथं कार्यकर्ता मेळाव्याला संबोधित करतील. तसंच नव्याने बांधलेल्या मेट्रो रेल्वेला हिरवा झेंडा दाखवतील आणि ५ हजार २०० कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या अनेक विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन करतील.

**<><><><><>**

दिल्ली एनसीआर परिसरातले रेबीजची लागण झालेले आणि आक्रमक वृत्तीच्या कुत्र्यांना वगळता उर्वरित कुत्र्यांना नसबंदी आणि लसीकरण करून त्यांच्या पूर्वीच्या परिसरात सोडण्यात यावं, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं आज दिले आहेत. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश न्यायमूर्ती विक्रम नाथ, संदीप मेहता आणि एन. व्ही अंजारिया यांच्या पीठानं यापूर्वी भटक्या कुत्र्यांच्या स्थलांतराचे निर्देश दिले होते. मात्र आज त्यांनी आपल्या निर्देशांमध्ये बदल केला. या नवीन निर्देशानुसार, भटक्या कुत्र्यांना खाऊ घालण्याला मनाई करण्यात आली असून त्यांच्यासाठी खाण्याच्या जागा निश्चित करण्यावर भर देण्यात आला आहे. तसंच, या प्रश्नाची व्याप्ती पाहता सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांना भटक्या

कुत्र्यांसंबंधीचं धोरण तयार करण्याचे निर्देश दिले आहेत. अशा प्रकरणांशी संबंधित ज्या याचिका देशभरातल्या विविध उच्च न्यायालयात प्रलंबित असतील, त्या सर्वोच्च न्यायालयात हस्तांतरित करण्याचे आदेशही देण्यात आले. भटक्या कुत्र्यांना हटवण्याच्या कामात अडथळा आणणाऱ्या संघटना किंवा गटावर कठोर कायदेशीर कारवाई केली जाणार आहे.

**<><><><><>**

नागालँड आणि आसाम मधल्या विवादित जमीन पट्ट्यावर वृक्षलागवडी सहित सर्व विकासप्रकल्प यापुढे संयुक्तपणे राबवण्याचा निर्णय दोन्ही राज्य सरकारांनी घेतला आहे. या विवादित जमीन पट्ट्यावर राहणाऱ्या बेकायदेशीर निर्वासितांना नुकतंच दोन्ही सरकारांनी संयुक्त प्रयत्न करून बाहेर काढलं होत.

**<><><><><>**

ईडी अर्थात सक्तवसुली संचालनालयानं आज जम्मूत विविध ठिकाणी छापे टाकले. यात प्रामुख्यानं भूमी कांड संबंधातल्या महसूल अधिकाऱ्यांच्या निवासस्थानांचा आणि कार्यालयांचा समावेश आहे. त्यात बेकायदेशीर व्यवहारांशी संबंधित असलेली कागदपत्रे आणि डिजिटल रेकॉर्ड जप्त केले गेल्याची माहिती स्थानिक पोलिसांनी दिली. कर चुकविणं आणि अनियमित उत्पन्न याबाबत संशय असलेल्या अहवालांनुसार हे छापे टाकण्यात आले.

**<><><><><>**

राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या खासदारांनी आज उपराष्ट्रपतीपदाचे उमेदवार सी. पी. राधाकृष्णन यांची भेट घेतली. केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी, मनोहर लाल, अर्जुन राम मेघवाल, हर्ष मल्होत्रा यांच्यासह दिल्ली, हरियाणा आणि राजस्थानातले खासदार यावेळी उपस्थित होते. उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसाठी या खासदारांनी राधाकृष्णन यांना शुभेच्छा दिल्या.

**<><><><><>**

भारताच्या पहिल्या एकात्मिक ग्रीनफिल्ड स्मार्ट औद्योगिक शहर प्रकल्पाअंतर्गत छत्रपती संभाजीनगरच्या शेंद्रा बिडकीन औद्योगिक क्षेत्रात अनेक कंपन्यांना औद्योगिक भूखंड देण्यात आले आहेत. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने एका पत्रकात ही माहिती दिली आहे. या कंपन्यांमध्ये खाद्यान्न, कागद, इलेक्ट्रॉनिक्स, रस्ते बांधणी उपकरणे, इत्यादी उद्योगांचा समावेश आहे. यामध्ये २०० कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित असून सुमारे १ हजार रोजगारनिर्मिती होण्याचा अंदाज आहे. छत्रपती संभाजीनगर औद्योगिक शहराची निर्मिती दिल्ली मुंबई औद्योगिक मार्गिकेच्या अंतर्गत होत आहे. या प्रकल्पाच्या योजनेसाठी केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांनी नुकतीच या क्षेत्राला भेट दिली होती. महाराष्ट्र औद्योगिक शहरे लिमिटेड तर्फे विकसित होणाऱ्या या प्रकल्पामुळे गुंतवणुकीला चालना मिळेल, व्यवसायसुलभता वाढीस लागेल आणि एक खिडकी परवानग्यांना चालना मिळेल.

<><><><><>

पोळ्याचा सण आज साजरा होत आहे. वर्षभर शेतात राबणाऱ्या बैलांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा सण साजरा केला जातो. बैलांना धुवून, शिंगाला रंग लावून आकर्षक झुली, रंगीबेरंगी सजावट करून गावातून वाजत गाजत मिरवणूक काढली जाते. घरी आल्यानंतर सर्वजण बैलांची पूजा करतात. शेतकरी त्यांना घरातील सदस्य असल्याचं मानतात.

<><><><><>

भारताच्या स्वातंत्र्याच्या शतकमहोत्सवापूर्वी, २०४७ पर्यंत विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी इस्रो भारतीय अंतराळ संशोधन संस्था योगदान देत राहील, अशी ग्वाही इस्रोचे अध्यक्ष व्ही. नारायणन यांनी आज दिली. नवी दिल्ली इथं राष्ट्रीय बैठकीच्या उद्घाटनाच्या सत्रात ते बोलत होते. कक्षेत दोन उपग्रह जोडणं आणि वेगळं करणं ही प्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण करणाऱ्या चार

देशांपैकी भारत एक आहे, असं त्यांनी नमूद केलं. चंद्राच्या कक्षेत असलेला सर्वोत्तम कॅमेरा आज भारताचा आहे, याकडेही त्यांनी लक्ष वेधलं.

<><><><><>

बांग्लादेशात लैंगिक अत्याचारांचं प्रमाण धक्कादायक पातळीवर गेल्याचं मानव अधिकार काँग्रेसनं (एचआरसीबीएम) म्हटलं आहे. त्यात प्रामुख्यानं अल्पसंख्याक समुदायाच्या महिला आणि मुलांचा समावेश आहे. २०२५च्या पहिल्या तिमाहीत ३४२ बलात्कारांच्या तक्रारी अधिकृतपणे नोंदवल्या गेल्या असून त्यात ८७ टक्के अल्पवयीन मुलींचा समावेश आहे. बांगलादेशभर लैंगिक अत्याचारांच्या वाढत्या घटनांच्या संदर्भात न्यायालयीन चौकशीची मागणी तसंच बांगलादेशाच्या उच्च न्यायालयात सार्वजनिक हिताची याचिका दाखल केली असल्याचं आयोगानं म्हटलं आहे.

<><><><><>

कोलंबियात झालेल्या २ हल्ल्यात किमान १८ लोकांचा मृत्यू झाला तर ४० हून अधिक जण जखमी झाले आहेत. कोलंबियन एरोस्पेस फोर्सच्या तळाजवळ एका स्फोटकांनी भरलेल्या वाहनाचा स्फोट होऊन ही दुर्घटना घडली. कोलंबियाचे अध्यक्ष गस्टाव पेत्रोने यांनी या हिंसाचाराचा निषेध केला आहे. यात कोलंबियाच्या क्रांतिकारी सशस्त्र दलांच्या गटांचा हात असल्याचा संशय अधिकाऱ्यांनी व्यक्त केला असून पुढील तपास सुरु आहे.

<><><><><>

अरुणाचल प्रदेश, बिहार, पूर्व राजस्थान, पश्चिम बंगाल, गुजरात, झारखंड, नागालँड, मणिपूर, मिझोराम, त्रिपुरा, ओडिशा, उत्तराखंड, आणि मध्यप्रदेशात आज जोरदार ते अति मुसळधार पावसाचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. उर्वरित राज्यांमध्येही येत्या २ ते ३ दिवसांसाठी मुसळधार पावसाचा अंदाज आहे. ईशान्येकडच्या राज्यांसहित उत्तर भारतात काही ठिकाणी, तसंच ओडिशा आणि

तेलंगणात सोसाट्याच्या वाऱ्यासह पावसाचा अंदाज वर्तवला आहे. पश्चिम बंगाल, कोकण, गोवा, ओडिशा, सौराष्ट्र आणि कच्छ भागात सोसाट्याच्या वाऱ्याचा अंदाज व्यक्त केला आहे.

**//<><><><><>//**